# <u>संवत्सर</u>

भारतामध्ये राजेलोक स्वतःच्या नावाने कालगणना सूरू करत असत. त्याचा उद्देश त्या पराक्रमी राजाची आठवण शतकानुशतके लोकांच्या मनात राहवी. इंग्रजी महिन्यांची नावे सम्राटांच्या नांवावरुनच घेतली आहेत. सद्यःस्थितीत लोकशाहीच्या नांवाने संवत्सर सुरू करणे सर्वांना अवडेल. तसेच महिन्यांची नावे स्वातंत्र लढ्यात प्राणाची पर्वा न करता सहभागी झालेल्या योध्यांची असावीत. असे केल्याने त्या व्यक्तींचे पुतळे उभारण्याची गरज उरणार नाही.

माझ्यामते १ जानेवारी १९५० हा या संवत्सराचा पहिला दिनांक समजावा तसेच या कालगणणेचे नांव मोहन असावे. महिन्यांची नांवे प्रताप, शिवाजी, टिपू, लक्ष्मी, दादा, बाळ, जवाहर, सुभाष, भीम, राजेंद्र, भगत व अण्णा असावीत. महिन्याचे दिवस इंग्रजी महिन्याप्रमाणेच असावेत. शक्यतो ज्या महिन्यात ज्या महान व्यक्तीचा जन्म झाला त्या महिन्याला त्या व्यक्तीचे नांव द्यावे.

संवत्सराची नांवे स्वातंत्र्य सैनिक तसेच ज्यानी ज्यानी भारताच्या प्रगतीला हातभार लावला त्या महान व्यक्तींची असावीत. दैनेदिनीच्या महिन्याच्या पानावर ज्या नावाने महिना आहे त्यांचे, महात्मा गांधी तसेच ज्यांच्या नांवाने संवत्सर आहे त्यांचे अशी तीन चित्रे असावीत.

कालगणना या प्रकारे करण्यात मोठा अडथळा किंवा वाद महिन्यांच्या नांवावरून होण्याची शक्यता आहे. तो सर्व सामंजस्वाने सोडवावा.